# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २९/०३/२००६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा बुधवार दिनांक २९/०३/२००६ रोजी सभा सुचना क्र. ३० दि. २४/०३/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सभापती |
| २) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ३) | श्री. मिलन गोविंदराव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ५) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| ६) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ७) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ८) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ९) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| १०) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ११) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| १२) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| १३) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| १४) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| २) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |

**मा. सभापती :-**

मार्च अखेरची सभा असल्यामुळे आपण सर्वांनी खेळीमेळीच्या वातावरणात एकच विषय आहे.

(मा. नगरसचिव सो. ह्यांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

नगरसचिव साहेब, सर्व मिरा भाईंदरच्या रहिवाशांना, सर्व सदस्यांना व सर्व अधिकरी, कर्मचारी वर्ग सर्वांना उद्याच्या गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा देतो असा मी ठराव मांडत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

अनुमोदन आहे. सचिव साहेब, मा. आयुक्त साहेब, आपल्याला आज अतिक्रमणच्या त्यासाठी विषय होता.

**अभिनंदन ठराव क्र. २४७(अ) :-**

मिरा भाईंदरच्या सर्व रहिवाशांना, सर्व सदस्यांना व सर्व अधिकरी, कर्मचारी वर्ग सर्वांना उद्याच्या गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा देतो असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. सुर्यकांत भोईर.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. नगरसचिव :-**
विषय झाल्यानंतर बोलला जाईल.

**प्रेमनाथ पाटील :-**
विषय झाला तर ते निघून जातील. त्यांच्यासाठी एक छोटेसे काम होते.

**गजानन भोईर :-**
मा. सभापती साहेब, आज एकच विषय आहे. जर तो काल घेतला असता तर काय अडचण होती?

**मा. सभापती :-**
नाही. त्याचा अजेंडा डिक्लेअर झाला नव्हता.
(मा. नगरसचिव सोा. ह्यांनी प्रकरण क्र. २४० चे वाचन केले.)
(सन्मा. सदस्य श्री. सुर्यकांत भोईर ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**
माझे अनुमोदन आहे.

**जयंत पाटील :-**
मा. सभापती साहेब, मेसर्स वालीया बॉडी बिल्डर यांचे सर्व करासहीत एक करोड साठ लाख रुपये आहे आणि आपण देवीच्या वाजवी दराकडून............

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सोा.) :-**
ते त्यांचे टॅक्सेस वेगळे आहेत.

**जयंत पाटील :-**
त्यांचे टॅक्स किती होतील?

**गजानन भोईर :-**
डिफरन्स किती आहे?

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सोा.) :-**
बारा-तेरा लाख रुपये होतील.

**जयंत पाटील :-**
बारा-तेरा लाख रुपये नक्की का?

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सोा.) :-**
नक्की.

**जयंत पाटील :-**
म्हणजे त्याचे नाहीतर एक करोड साठ लाख रुपयाच्या वरती जायचे.

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सोा.) :-**
नाही.

**मिलन पाटील :-**
ह्याला जे टॅक्स आहे ते चार टक्के आहे ना?

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सोा.) :-**
व्हॅट १२ टक्क्यांचा आहे आणि लोकल टॅक्सेस एक्स्ट्रा ४ टक्के आहे. सगळे करुन बारा-तेरा लाख रुपये होतात.

**गजानन भोईर :-**
५० टक्के आगावू रक्कम आहे.

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सोा.) :-**
ती गाडी रेस्क्यु व्हॅन असते. त्या व्हॅनला वेगळ्या कंपनीचे आपण एस्टीमेट सांगतो. त्याच्यावर त्याला बसवावे लागते. आत्ता पावर जनरेटर समजा, वेगवेगळे एन्स्ट्रुमेंट असतात. केबल विंग शेक असते. गाडी ओढण्यासाठी दुसरा पावर जनरेटर असते. किर्लोस्कर कंपनीचे त्याच्या जवळ पाच-पन्नास लाख रुपये किंमत आहे. युनाटिक ऑपरेटीव्ह लाईट आहे. लाईट मास्क असतो. त्यासाठी त्याची एस्टीमेट असते. त्याची कंपनी वेगळी असते. ती कंपनीवर तो पर्चेस करणार आणि पर्चेस करुन त्या रेस्क्युवर करणार.

**गजानन भोईर :-**
कुवरची देवगिनी आणखीन कुठे आहे?

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

प्रत्येकाने दहा-दहा ठिकाणी काम केले.

**गजानन भोईर :-**

दाखवा ते कुठे केले? कुठल्या पालिकेत केले?

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

वेगवेगळ्या ठिकाणी केले. आपल्याकडे लिस्ट आहे. हे आपण पहिले केलेले आहे. वेगवेगळ्या महापालिकेत त्यांनी केले.

**जयंत पाटील :-**

आपण जर १६ लाख रुपये पकडले तर हे कमीच आहे.

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब, या संदर्भात आपण महाराष्ट्र शासनाकडून अग्निशमन सल्लागारांना त्यांच्याकडून स्पेसिफिकेशन मागवली होती आणि बजेट कॉपी पण मागवली. त्यानी ८०-८२ पण त्यांचे बजेट कॉपी सांगितले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

८०-८२, हे ८९ लाख रुपये आहे.

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

नाही. लोकल टॅक्स व्यतिरिक्त त्यांनी ८०-८२.........

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हे जे ८९ लाख रुपये जे आहे ते लोकल टॅक्स व्यतिरिक्त आहे ना?

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

व्यतिरिक्त आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मग, साडेसात लाख रुपये जास्त आहे ना?

**जयंत पाटील :-**

टोटल १६ लाख रुपये याच्यात ॲड करा ना.

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

त्यांनी अंदाजित किंमत सांगितली.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही एक काम करा. हे सर्व करांव्यतिरिक्त निविदा हा शब्द काढून टाका ना. मग आपण कशाला लायेबल आहेत.

**मा. सभापती :-**

कुठले?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जे कर भरायला पाहिजे ते महानगरपालिकेने भरायला पाहिजे.

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण त्यांना व्हॅट एक्स्ट्रा देऊ या.

**प्रेमनाथ पाटील :-**

पानपट्टे साहेब, कर म्हणजे नेमके कुठचे कर?

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

व्हॅट आणि ऑक्ट्रॉय.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये एवढी मशिनरी येते.

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मा. आयुक्त साहेब, आपले पैसे वाचतील.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आपल्या आरोग्य विभागात, बांधकाम विभागात एवढे मटेरियल येतात ते आपण सगळे एकदम देणार का? आपल्या महानगरपालिकेमध्ये बांधकाम विभागात, आरोग्य विभागात कुठल्या डिपार्टमेंटला ज्या गाड्या येतात त्या ज्या मटेरियल येतात. त्या सगळ्यांना आपण व्हॅट आणि ऑक्ट्रॉय माफ करणाऱ्याला पत्र देणार का?

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब, व्हॅट माफ नाही. फक्त ऑक्ट्रॉय माफ आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण व्हॅट भरला ना? मग बाकीचे मटेरियल आणि बाकीच्या गाड्यांचे काय?

**जयंत पाटील :-**

ते वालीया बॉडी बिल्डर आहे ना. त्यांनी सर्व करासाठी दिलेले आहे आणि हा कर गृहित आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्याला आपण देतो ना.

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

हो. वेगवेगळे बॅलेन्स आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

वेगवेगळे देतो?

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

सोलापूरला केलेले आहे. पुणे आणि सोलापूर महानगरपालिकेत या संदर्भातून महाराष्ट्र शासनाकडून गाईडलाईन्स मागवल्या होत्या. याच्या संदर्भात स्पेसिफिकेशन काय आहे? त्यांनी पुन्हा पुन्हा यांच्यामधून फ्री क्वालिफिकेशन केले होते. ते कमीत कमी पंचवीस एक वॉटर टेंडर आणि मिनिमम दोन रेस्क्यु व्हॅन असे ज्यांनी बांधले त्यांनाच फक्त आपण टेंडर फॉर्म दिला होता. कटर मशिन्स असतात ते स्लॅब कटर, मेटल कटर, असते. पुर्ण स्लॅबवर उचलायचे असते. फॉर्म असतो फायरमध्ये एक रेस्क्यु मध्ये सुट असतात. आगीमध्ये प्रवेश करण्यासाठी...........

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

समजा, आपल्याला रिबीट द्यायची असेल त्या संबंधित आपण रिबीट यांना अपेक्षित आहे. तेवढा रिबिट यांना जास्त द्यावा लागेल. ठेका आपल्याला रिबिट देणार नाही.

**मिलन पाटील :-**

मागच्या वेळेला मी गेलो होतो फायर ब्रिगेडमध्ये तर हे कटर होते ना? किंवा २ इंच, तीन्ही बंदच होत्या. म्हणजे तिकडे कोणाला काही कल्पना नव्हती की, रजेवर किंवा त्यावेळेला मुंबईला कुठे गेले ते माहित नाही. त्यावेळेला मी तुम्हांला फोन केलेला होता. त्यावेळेला मी आलो होतो........

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

त्यावेळेला आपले कटर वन विभागाला नेले होते. ते कटर वन विभागाने खराब केले होते. नंतर त्यांनी दुरुस्त करुन दिले.

**मिलन पाटील :-**

आपल्याकडे एकपण कटर नव्हते.

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

त्यावेळेला नव्हते. पण आत्ता मागवले. काहीच नव्हते. पण आत्ता मागवले. साहेब, याच्यामध्ये आहे, ५ कटर आहेत या विभागाला.

**मा. सभापती :-**

विषय मंजुर झालेला आहे. असे काय मिटींगला बोलता.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

त्यांना माहिती पाहिजे होती. ती माहिती दिलेली आहे.

**प्रकरण क्र. २४० :-**

अग्निशमन विभागातील रेक्यु टेंडर चेसीसवर बॉडी बांधणे कामी आलेल्या निविदेला मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. २४८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन विभागासाठी लागणारे नविन फायर फायटर खरेदी करणेकामी मा. महासभेने दि. १७/०८/२००५, ठराव क्र. ३४ अन्वये मंजुरी दिलेली आहे. त्यास अनुसरुन रेस्क्यु टेंडर चेसीसवर बॉडी बांधणेकामी दि. २५/०२/२००६ रोजी दै. सागर व वृत्तमानस या वृत्तपत्रात फेर जाहीर निविदा सुचना प्रसिद्ध करुन निविदा मागविण्यांत आल्या होत्या. त्यास अनुसरुन सदर कामी ३ निविदा मुदतीत प्राप्त झाल्या असून सदरच्या निविदा दि. १३/०३/२००६ रोजी उघडण्यांत आल्या असून त्यांचे दराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| अ.क्र. | तपशिल | मे. देवी फायर सर्व्हिस | मे. कुंवरजी देवशी ॲन्ड कं. प्रा.लि. | मे. वाडीया बॉडी बिल्डर्स |
|---|---|---|---|---|
| १ | चेसी क्र. LPT - १६१३/४८ ६९७ TCIC EURO - II१२१० COWL वर रेस्क्यू टेंडर बांधणे. | ८९,६०,०००/- सर्व कराव्यतिरिक्त | ९५,००,०००/- सर्व कराव्यतिरिक्त | १,६०,००,०००/- सर्व करासहित |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मे. देवी फायर सर्व्हीस यांचे दर सर्वात कमी व वाजवी आहेत. मे. वाडिया बॉडी बिल्डर्स यांचे दर सर्व करासहित आहेत. मे. देवी फायर सर्व्हिस व मे. कुँवरजी देवशी ॲन्ड कं. प्रा.लि. यांचे दर कराव्यतिरिक्त आहेत. बाजारभावाशी तुलना केली असता मे. देवी फायर सर्व्हिस यांचे दर वाजवी असून सर्वात कमी आहेत. तरी त्यांची सर्व कराव्यतिरिक्त निविदा स्विकारण्यास व त्यांच्या मागणीनुसार ५०% आगाऊ देण्यांस मा. स्थायी समिती मंजरी देत आहे.

**सुचक :- श्री. सुर्यकांत भोईर.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**सुर्यकांत भोईर :-**

पुन्हा एकदा सर्वांना गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा!

**मा. सभापती :-**

सन्मा. स्थायी समिती सदस्य, सदस्या, त्याचप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेचे उपायुक्त खतगावकर साहेब, इतर सर्व कर्मचारी, आपले लेखापाल या ठिकाणी आपल्या हिंदू धर्माच्या प्रमाणे नवीन वर्ष, उद्याच्या येणाऱ्या गुढीपाडव्याच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा! हे वर्ष आपल्याला सुखसमृद्धीचे, खेळीमेळीच्या वातावरणात, भरभराटीचे जावो.

**जयंत पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपण सर्वांना हार्दिक शुभेच्छा दिल्या. आमच्या सर्व सदस्यांतर्फे आपले हे वर्षसुद्धा भरभराटीचे जावो.

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, महानगरपालिका अधिकारी वर्ग आणि महानगरपालिका कर्मचारी वर्ग अपणा सर्वांनी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडल्याबद्दल सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे मी जाहीर करित आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १२.०० वाजता.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**